साप्ताहिक

# गोदावरी


परिवार

RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490

सवलतीचा पोस्ट रजि.नं.-JAL/120/2022-24

✻ दि. १५ ऑक्टो. जागतिक अंध दिन
✻ दि. १६ ऑक्टो. कोजागिरी पौर्णिमा





✻ वर्ष २५ वे ✻ अंक ४२ ✻ सोमवार १४/१०/२०२४ ✻ डाक १६/१०/२०२४ ✻ पाने – ४ ✻ किंमत २ रुपये
✻ year 25 ✻ issue 42 ✻ monday : 14 / 10 / 2024 ✻ post Dt. 16/ 10 / 2024 ✻ pages - 4 ✻ price 2 Rs.

## डॉ.वर्षा पाटील यांचा वाढदिवस उल्हासित वातावरणात साजरा



**जळगाव – गोदावरी फाउंडेशनच्या सचिव डॉ. वर्षा पाटील यांचा वाढदिवस आज मोठ्या उत्साहात आणि मंगलमय वातावरणात साजरा करण्यात आला. डॉ. वर्षा पाटील यांना वाढदिवसानिमीत्त शुभेच्छा देण्यासाठी अक्षरश: रिघ लागली होती. डॉ. वर्षा पाटील यांनी प्रत्येकांच्या शुभेच्छांचा मनापासून स्विकार केला.**



गोदावरी फाउंडेशनच्या सचिव डॉ. वर्षा पाटील यांच्या वाढदिवसानिमीत्त विविध उपक्रम राबविण्यात आले. सकाळी निवासस्थानी डॉ. वर्षा पाटील यांचे औक्षण करण्यात आले. तसेच चिमुकल्या नाती कु. किवा आणि सारा यांच्या हस्ते केक कापण्यात आला. याप्रसंगी आधारस्तंभ असलेल्या गोदावरी आजी, अनिल पाटील, अलका पाटील, राधा नायर, राजेश साठे, अनंत साठे, सचिन पाटील यांच्यासह रूग्णालयातील सहकारी उपस्थित होते. डॉ. उल्हास पाटील कृषी महाविद्यालयाच्या परिसरात केळी या पिकाचे रोपण करण्यात आले. यावेळी गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष माजी खा. डॉ. उल्हास पाटील, डॉ. अनिकेत पाटील, कृषी महाविद्यालयाचे संचालक डॉ. एस.एम. पाटील, प्राचार्य अशोक चौधरी, शैलेश सपकाळे, रजिष्ट्रार अतुल बोंडे, मिलिंद तायडे आदी मान्यवर उपस्थित होते.

**सारा सभागृहात केक कटींग**

डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिसरात असलेल्या सारा सभागृहात सचिव डॉ. वर्षा पाटील यांच्या वाढदिवसानिमीत्त अभिष्टचिंतनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी डॉ. वर्षा पाटील यांच्या हस्ते केक कापण्यात आला. याप्रसंगी डॉ. उल्हास पाटील यांनी डॉ. वर्षा पाटील यांना केक भरवून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी हृदयरोग तज्ञ डॉ. वैभव पाटील, गोदावरी फाऊंडेशनच्या संचालिका डॉ. केतकी पाटील, कु. किवा पाटील, कु. सारा पाटील, डॉ. अनिकेत पाटील, महाविद्यालयाचे संचालक डॉ. एन.एस. आर्विकर, डॉ. माया आर्विकर, डीन डॉ. प्रशांत सोळंके, रजीस्ट्रार प्रमोद भिरूड, अन्नपूर्णालयमचे प्रमुख डी.टी. राव, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.एच. पाटील, गोदावरी आयएमआर महाविद्यालयाचे संचालक डॉ. प्रशांत वारके, फिजीओथेरेपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयवंत नागूलकर, नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्या विशाखा गणवीर, रूग्णालयाचे प्रशासन अधिकारी एन.जी. चौधरी, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रवीण फालक,भिरूड परिवारातील श्रीमती नलिनी भिरूड, ज्योत्सना भिरूड, प्रशासन अधिकारी आशिष भिरूड, मंजुषा भिरूड, रेक्टर अर्चना भिरूड, संस्कृती भिरूड, सृष्टी भिरूड, निर्मीती भिरूड, डॉ. केतकी पाटील नर्सिंग महाविद्यालयाचे संचालक शिवानंद बिरादर, प्रा. पियुष वाघ, संकेत पाटील, नर्सिंग महाविद्यालयाचे प्रशासन अधिकारी प्रवीण कोल्हे, फिजीओथेरेपी महाविद्यालयाचे प्रशासन अधिकारी राहुल गिरी, वरीष्ठ लेखापाल योगेश पाटील, आयटी विभागाचे प्रमुख सुनील बोंडे, लेखापाल विकास बेंडाळे, किशोर झांबरे, रमाकांत पाटील, अजय वाणी, नीलेश नारखेडे, हेमंत बऱ्हाटे, महेश चौधरी, केतकी मेडिकोजचे प्रमुख नीलेश पाटील, जितेंद्र पाटील, प्रशासन अधिकारी अशोक भिडे, अस्थिरोग तज्ञ डॉ. दीपक अग्रवाल, नाक-कान-घसा तज्ञ डॉ. अनुश्री अग्रवाल, टी.व्ही. पाटील, खाचणे मामा, प्रशासकीय विभागाचे अनंत इंगळे, ग्रंथपाल गोपाळ भोळे, मिलींद पाटील, अमोल बोंडे, पंकज राणे, मिलींद सरोदे, ललित बोंडे, तुषार फेगडे, किशोर पाटील, नंदकिशोर शेळके, नरेंद्र नेमाडे, प्रवीण चुडीवाले, मनोज सोनार, मनिषा जोशी, रूपाली जंगले, श्रध्दा सावके, गुंजन भंगाळे, प्रिया शुक्ला, कांचन राणे, जान्हवी भिरूड, ज्योत्स्ना फेगडे, सुवर्णा बोरोले, अर्चना भोळे, दिपाली कोल्हे, लिना भोळे, प्रेरणा पाटील, सागर पाटील, राजेश पाटील, नीलेश पाटील, रितेश बोरोले यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.







## गर्भपिशवीसह अंडाशयातून निघाल्या गाठी

### डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील स्त्रीरोग अन् शल्यचिकीत्सकांचे यश

**जळगाव – जालना जिल्ह्यातील एका ४६ वर्षीय महिलेच्या गर्भपिशवी आणि अंडाशयात असलेल्या गाठी शस्त्रक्रियेद्वारे काढण्यात डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील स्त्रीरोग आणि सर्जरी विभागाच्या तज्ज्ञांना यश आले आहे. या शस्त्रक्रियेमुळे महिला रूग्णाचे प्राण वाचले.**

याबाबत माहिती अशी की, जालना जिल्ह्यातील निर्मला लहाने या महिलेच्या पोटात गेल्या दोन वर्षापासून दुखत होते. ही महिला उपचारासाठी पुणे येथे गेली होती. मात्र त्याठिकाणी अपेक्षित असे उपचार झाले नाही. अखेरीस निर्मला लहाने यांना उपचारासाठी डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात जाण्याचा सल्ला देण्यात आला. या सल्ल्यानुसार निर्मला लहाने ह्या डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात उपचारासाठी भरती झाल्या. स्त्रीरोग विभागातील तज्ज्ञ डॉ. प्रिया राठोड यांनी या रूग्णाची सोनोग्राफी, सीटी स्कॅन अशा तपासण्या केल्या. तपासणी अंती महिलेच्या गर्भपिशवीत उजव्या अंडाशयावर ५/६ सेंमी आणि आतड्यांना चिकटलेली १०/१० सेंमीची गाठ असल्याचे निदान करण्यात आले. या दोन्ही गाठींमुळे निर्मला लहाने यांना पोटात प्रचंड वेदना होत होत्या. अखेरीस महिला रूग्णावर शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. प्रिया राठोड यांनी उजव्या अंडाशयावर शस्त्रक्रिया करून गाठ काढली.

या शस्त्रक्रियेसाठी डॉ. हंसिया पिल्लई, करूणेश गुप्ता यांनी सहकार्य केले. तसेच आतड्यांना चिकटलेल्या गाठीसाठी शल्यचिकीत्सा विभागाचे तज्ज्ञ डॉ. चैतन्य पाटील यांना पाचारण करण्यात आले. त्यांनी त्यांच्या टीमसह कौशल्यपणाला लावत आतड्याला चिकटलेली गाठ काढण्यात यश मिळविले. महिलेवर टोटल ॲबडॉमिनल हिस्टोक्टोमी प्लस लोअर साइडेड सॅल्फींगो उफरेक्टोमीची शस्त्रक्रिया करून महिलेच्या पोटातून दोन गाठी काढण्यात आल्याने रूग्णाचे प्राण वाचले. रूग्णाच्या कुटूंबियांनी रूग्णालयातील डॉक्टरांचे आभार मानले.



रुग्णासमवेत तज्ञ डॉक्टर आणि त्यांची टीम छायाचित्रात दिसत आहे. (छायाचित्र : नितीन नेवे)

## संपादकीय

# अभिजात मराठी

मराठी जनांचा नवरात्रोत्सवाचा आनंद द्विगुणीत करणारा एक महत्त्वपूर्ण निर्णय केंद्र सरकारने याचवेळी घेतला. मराठी भाषेला 'अभिजात भाषा' म्हणून दर्जा देण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत झाला. मायमराठीला हा बहुमान देण्यासाठी केंद्र सरकारने शारदीय नवरात्रोत्सवातील घटस्थापनेचा मुहूर्त साधला. मराठीजनांना गेल्या अनेक वर्षांपासून या निर्णयाची प्रतीक्षा होती. या प्रलंबित मागणीची अखेर पूर्तता झाली. मराठीसोबत पाली, बंगाली, आसामी आणि प्राकृत या प्रादेशिक भाषांनाही 'अभिजात दर्जा' मिळाला आहे.

'माझा मराठीची बोलू। अमृतातेही पैजा जिंके ।। ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन।।' अशा सार्थ शब्दांत संत ज्ञानेश्वर माऊलींनी मराठी भाषेची थोरवी कितीतरी वर्षे आधी सांगितली. त्या मराठी भाषेला 'अभिजात भाषा' म्हणून सरकारी मान्यतेची मोहोर उमटवून घेण्यासाठी केंद्र सरकारच्या दारात अनेक वर्षे तिष्ठावे लागले. मराठी ही अभिजात भाषा आहे, तिला अभिजात भाषेचा दर्जा द्या, अशी मागणी मराठी मुलखातून गेली अनेक वर्षे केली जात होती. महाराष्ट्रातील बहुतेक राजकीय पक्ष, साहित्यिक आणि समस्त मराठी भाषाप्रेमींनी यासाठी आग्रही भूमिका घेतली होती.

मराठी भाषेचे वय अडीच हजार वर्षांचे आहे. मराठीला 'अभिजात भाषा' म्हणून मान्यता मिळण्यासाठी लागणारे आवश्यक ते सर्व भक्कम पुरावे महाराष्ट्र सरकारने केंद्र सरकारला पाठवले, पण केंद्र सरकारमधील तथाकथित भाषातज्ज्ञ मंडळींना मात्र ते पुरावे आणि मागणीपटत नव्हती. आणखी पुरावे सादर करा, असे सांगत चालढकल केली जात होती. काहीही असो, पण केंद्र सरकारचे सर्व निकष आणि अडथळ्यांचे डोंगर पार करून मराठी भाषेने अखेर 'अभिजात दर्जा' मिळवला आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा द्यावा, अशी मागणी दरवर्षी मराठी राजभाषा दिनानिमित्त हमखास केली जात असे. त्यानिमित्त हा विषय नेहमी चर्चेत येत असे. राज्यातील हजारो ग्रंथालये समृद्ध होतील. मराठी भाषा विकासासाठी कार्य करणार्या व्यक्ती आणि संस्थांनासुद्धा मदत मिळेल. प्रत्येक विद्यापीठात अभिजात भाषेसाठी अध्यासन केंद्र स्थापन केले जाईल. मायमराठीच्या सर्वांगीण विकासाची कवाडे खुली होतील. केंद्र सरकारच्या या निर्णयाचे श्रेय घेण्याची चढाओढ राज्यातील राजकीय पक्षांत लागली नसती तरच आश्चर्य वाटले असते, पण याबाबतीतही चढाओढ सुरू झाली आहे. निवडणूक प्रचारासाठी सर्व राजकीय पक्षांना एक नवा मुद्दा मिळाला आहे. मराठी भाषेबाबतचा प्रदीर्घ काळ रखडलेला हा निर्णय अचानक कसा घेतला गेला? याबद्दल आता वृत्तवाहिन्यांवर चर्चासत्रे रंगतील. मराठी 'अभिजात भाषा' झाल्याने महाराष्ट्रासह जगभरातील मराठी भाषिक आणि मराठी भाषाप्रेमींच्या आनंदाला उधाण आले आहे.

# मोफत सामुदायिक आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## डॉ.केतकीताई पाटील यांच्याद्वारे शिबिरार्थींची आस्थेवाईकपणे विचारपूस

**जळगाव : राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत उपमुख्यमंत्री( गृह/विधी व न्याय) यांचे कार्यालय व गोदावरी फाउंडेशन जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने जळगाव शहरात दोन दिवस मोफत सामुदायिक आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते.**

या शिबिरात तज्ञ् डॉक्टरांकडून रुग्णांची तपासणी करण्यात आली असून आवश्यकतेनुसार गोळ्या-औषधी हि देण्यात आली. या शिबिरांना स्वतः भाजप महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष डॉ केतकी ताई पाटील यांनी भेटी देऊन शिबिरार्थींची आस्थेवाईकपणे विचारपूस करून त्यांच्या शंकाचे निरसन केले.



शनिवार दिनांक ५ व रविवार दिनांक ६ ऑक्टोबर रोजी अनुक्रमे जळगाव शहरातील रामेश्वर कॉलनी येथे व खडके चाळ बहुउद्देशीय संस्था संचलित श्री गुरुदत्त उत्सव समिती मित्र मंडळ शिवाजी नगर येथे मोफत सामुदायिक आरोग्य शिबिर घेण्यात आले. शिबिरात रक्तदाब, मधुमेह तसेच रक्ताच्या विविध तपासण्या करण्यात आल्यात. याशिवाय नागरिकांना असलेल्या विविध शारीरिक व्याधी जाणून घेत तज्ञ् डॉक्टरांनी शंकांचे निरसन केले.

या प्रसंगी खुद्द गोदावरी फाऊंडेशन संचालिका तथा भाजप महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष यांनी भेटी देऊन शिबिरांची माहिती घेतली. या प्रसंगी उपस्थित शिबिरार्थींचीही त्यांनी विचारपूस केली तसेच आयोजकांशी संवाद साधला. या शिबिराचा फायदा होत असल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

## श्री गुरुदत्त उत्सव समिती मित्र मंडळ

**जळगाव – शहरात रविवार दिनांक ६ ऑक्टोबर रोजी खडके चाळ बहुउद्देशीय संस्था संचलित श्री गुरुदत्त उत्सव समिती मित्र मंडळ शिवाजी नगर येथे सकाळी ९ ते दुपारी २ वाजे दरम्यान मोफत सामुदायिक आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात विनामूल्य तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले तसेच मोफत रक्त तपासणी करण्यात आली.**

शिबिरास भाजप महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा डॉ. केतकीताई पाटील, हृदयविकार तज्ञ् डॉ.वैभव पाटील, महेश चौधरी यांच्यासह मान्यवरांनी सदिच्छा भेटी दिल्या. याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष पवन झुंजारराव , योगेश आवटे, ललित नन्नवरे, मनोज तीळवणे, अतुल शिरसाळे, आकाश जाधव आणि कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. शिबिरात गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय आणि धर्मदाय रुग्णालयाचे डॉ. हर्ष पटेल, डॉ.अपूर्वा गवई , डॉ.अरिभा आझमी, डॉ.प्रतिभा चिंचुरकर यांनी रुग्णांची तपासणी केली. यावेळी परिचारिका यांनीही सेवा दिली. महा लॅब चे दीपक महाजन रक्त तपासणी केली. या शिबिराचा शेकडो रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला.

## रामेश्वर कॉलनीतील शिबिरात शेकडो नागरिकांची आरोग्य तपासणी

*प्रभाग क्र. १४ मधील रामेश्वर कॉलनी येथे ५ ऑक्टोबर रोजी मोफत सामुदायिक आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते.*

*शिबिरास आशुतोष पाटील, भाजप महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा डॉ. केतकीताई पाटील, भारतीय जनता युवा मोर्चा मंडळ अध्यक्ष राहुल कुलकर्णी आणि भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी सदिच्छा भेट दिली.*

*शिबिरात डॉ उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय आणि धर्मदाय रुग्णालयाचे शल्यचिकित्सक डॉ.अपूर्वा गवई , मेडिसिन विभागाचे डॉ. रिषभ पाटील,डॉ.प्रतीक शहा यांच्यासह परिचारिकांनी सेवा दिली.*

# 'अवयवदाना'वर स्पर्धेतून जनजागृती

**जळगाव – अवयवदानाविषयी जागरुकता वाढवण्यासाठी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, जळगावचे अधिष्ठाता यांनी एक बैठक आयोजित केली होती, ज्यात डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत सोळंके उपस्थित होते आणि महाराष्ट्र सरकार आणि एन एम सीच्या सूचनेनुसार भारतीय अवयव दान विविध स्पर्धाचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला.**

११ जुलै ते ३ ऑगस्ट २०२४ या कालावधीत डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालयात पोस्टर मेकिंग, रांगोळी, निबंध लेखन, कविता, भाषण, घोषवाक्य आणि भूमिका स्पर्धा अशा विविध प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्यात. या दोन आठवड्यांमध्ये एमबीबीएसच्या सर्व बॅचमधील यूजी आणि पीजी विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. गोदावरी फॉउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील, डी एम कॉर्डीओलॉजीस्ट डॉ. वैभव पाटील,वैद्यकीय संचालक डॉ. एन. एस. आर्वीकर, अधिष्ठाता सर डॉ. प्रशांत सोळंके आणि कुलसचिव श्री. प्रमोद भिरूड सर यांच्या उपस्थितीत हे कार्यक्रम पार पडले. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. प्रशांत गुड्डेटी यांनी विद्यार्थ्यांसोबत केले होते.





# गोदावरी अभियांत्रिकी व तंत्रनिकेतनमध्ये स्टुडन्ट कौन्सिल इंस्टॉलेशन

जळगाव – कौन्सिलच्या माध्यमातून विद्यार्थी व शिक्षक वृंद यांचे परस्पर संबंध अधिक चांगल्या पद्धतीने जोपासले जातात व विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये या स्टुडन्ट कौन्सिलचा मोलाचा वाटा असतो.याच अनुषंगाने गोदावरी अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालयांमध्ये विदयार्थी परिषदेची स्थापना करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, प्रा. हेमंत इंगळे (अधिष्ठाता), प्रा दीपक झांबरे (डिप्लोमा समन्वयक) व सर्व विभाग प्रमुख तसेच शिक्षक वर्ग आणि सर्व शाखांचे विद्यार्थी उपस्थित होते. सुरुवात सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करून झाली. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

स्टुडन्ट कौन्सिल स्थापनेच्या समारंभात सर्व शाखांच्या कौन्सिलच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पदानुसार चेसचे वाटप करून त्यांना गौरवान्वीत केले.त्यानंतर शाखा निहाय विद्यार्थी प्रेसिडेंट यांनी त्यांच्या विभागाच्या स्टुडन्ट कौन्सिलची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली व आगामी काळात त्यांच्या कौन्सिलच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाचा आढावा त्यांच्या भाषणातून दिला.

# गोदावरीत 'डिजिटल धुरंदर' अंतर्गत स्पर्धेविषयी मार्गदर्शन

**जळगाव – या सोशल मीडिया अभियाना अंतर्गत डिजिटल धुरंदर या स्पर्धे विषयी महाविद्यालयां मध्ये अंतर्गत स्पर्धेविषयी मार्गदर्शन देण्यात आले.**



याप्रसंगी गोदावरी फाउंडेशनच्या सदस्या डॉ. केतकी पाटील (भाजप, उपाध्यक्ष महिला मोर्चा महाराष्ट्र), तसेच प्रमुख पाहुणे म्हणून प्रकाशजी गाढे (चेअरमन युथ फोरम) त्यांच्यासोबत त्यांची सर्व टीम व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील हे उपस्थित होते. कार्यक्रमांत प्रकाशजी गाढे यांनी मार्गदर्शन करताना डिजिटल धुरंदर या स्पर्धेसाठी १० थीम्स म्हणजेच विषय सुचविण्यात आले. त्यामध्ये पायाभूत सुविधांचा विकास, अनुसूचित जातीचे कल्याण आर्थिक विकास, ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण, मराठी संस्कृती आणि परंपरेचे जतन, कृषी आणि सिंचन क्षेत्रातील विकास, युवक कल्याण, आरोग्य आणि शिक्षण, व भारताची जागतिक प्रतिष्ठा: विश्व या विषयांवर ही स्पर्धा घेण्यात येणार आहे.दिनांक २७ सप्टेंबर पासून ते १० ऑक्टोबर पर्यंत या दरम्यान वेगवेगळ्या स्टेप्सच्या माध्यमातून ही स्पर्धा घेण्यात येणार आहे. वरील स्पर्धेमधील विषय रिल्स, व्हिडिओ, स्टॅटिक इंस्टाग्राम पोस्ट व मिम्स च्या फॉरमॅटमध्ये सादर करण्यात येतील. व त्या सोशल मीडिया तज्ञांच्या पॅनल मधील परीक्षकांमार्फत तपासल्या जातील व परीक्षक आणि जनतेच्या वोटिंग द्वारे पुरस्कारास पात्र ठरतील.स्पर्धेतील विजेत्यांची घोषणा आणि सन्मान करण्यासाठी मुंबईमध्ये १० ऑक्टोबर २०२४ रोजी भव्य पुरस्कार वितरण समारंभ आयोजित करण्यात येईल व तेथे तीन पुरस्कार दिले जातील. पहिला पुरस्कार २ लाख रुपये दुसरा पुरस्कार १.२५ लाख रुपये व तिसरा पुरस्कार १ लाख रुपये असे पुरस्काराचे स्वरूप राहील. या कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री फडवणीस यांची प्रमुख उपस्थिती राहील.

# राज्यस्तरीय पेपर स्पर्धेत गोदावरी अभियांत्रिकीचे यश

**जळगाव –महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचे सौजन्याने राज्यस्तरीय पेपर प्रेझेंटेशन स्पर्धेचे शासकीय तंत्रनिकेतन अहमदनगर यांचे तर्फे आयोजन करण्यात आले होते.**

सदर स्पर्धेत गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतन जळगावचे विद्यार्थी ग्रीष्मा जितेंद्र पाटील व पुष्पक सिद्धार्थ भालेराव या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. या विद्यार्थ्यांनी स्मार्ट ग्रीड स्कोप इन इंडिया – ए रिव्ह्यू या विषयावर प्रेझेंटेशन दिले. या स्पर्धेमध्ये त्यांनी घवघवीत यश संपादन केले.या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक मिळवून १०,०००/- चे रोख बक्षीस जिंकले आहे.त्यांना मार्गदर्शक प्रा. एन. सी. पाटील, प्रा. चंद्रकांत शिंपी, पदविका विद्युत अभियांत्रिकी विभाग प्रमुख प्रा. चेतन विसपुते, पदविका समन्वयक प्रा. दीपक झांबरे तसेच इतर शिक्षक वृंदांचे मार्गदर्शन लाभले.त्यांच्या या यशाबद्दल गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील, सचिव डॉ. वर्षा पाटील सदस्या डॉ. केतकीताई पाटील तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांनी त्यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या या यशाचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.




Editor : Subhash Patil (Reg. Newspaper) Weekly Godavari Parivar : Owner, Publisher, Printer : Dr. Mrs. Varsha Patil printed at Subhash Printers, 38, Trimbak Nagar, Near Shakuntala Rane Primary School, Beside Narayani Park Apartment, Mahabal Area, Jalgaon 425002 (Mah.) Godavari Hospital, Released at Jalgaon, Near Bhaskar Market. Phone no. 2221834/35, should be sent to this email for publication of news in the issue (Editors do not necessarily agree with the views published in the issue.)

संपादक : सुभाष पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी सुभाष प्रिंटर्स, ३८, त्र्यंबक नगर, शकुंतला राणे प्रायमरी स्कूलजवळ, नारायणी पार्क अपार्टमेंट शेजारी, महाबळ एरिया, जळगांव ४२५००२ (महा.) येथे छापून गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव येथे प्रसिद्ध केले. फोन नं. २२२१८३४/३५, अंकात बातम्या प्रसिध्द करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात Email : godavari.parivar@gmail.com (अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

## गोदावरी नर्सिंगमध्ये नवरात्रोत्सवाची धम
# ढोलबाजे ढोलच्या तालावर तरूणाई थिरकली



**जळगाव – येथील गोदावरी नर्सिंग महाविद्यालयात नवरात्रोत्सवाची धुम सूरू असून ढोल बाजे ढोलच्या तालावर तरूण तरूणाई पावले थिरकत आहे.**

नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने गोदावरी नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी गरबा नृत्याचा रंगारंगतेने सजलेला हा कार्यक्रम महाविद्यालयात मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला आहे. युवक-युवती पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले असून, सांस्कृतिक वातावरणात गरब्याच्या तालावर नाचत आहेत.

वेगवेगळया पध्दतीने सादरी करण देखिल करत आहे. या निमीत्ताने महाविद्यालयातर्फे विविध स्पर्धा आयोजित केलेल्या असून आकर्षक बक्षीस देखिल ठेवण्यात आलेली आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहे.



डॉ. प्रेमचंद पंडित
(९४२२९१५३७९)
(निवृत्त सिव्हील सर्जन, बुलडाणा)
वैद्यकीय अधीक्षक
डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

प्रेम दोन

1. *Live a life that is intentional and thoughtful.*
   – *जीवन को जानबूझकर और सोच-समझकर जियो।*
2. *Develop more positive self-image and deepen understanding of others.*
   – *अधिक सकारात्मक आत्म-छवि विकसित करें और दूसरों की समझ को गहरा करें।*
3. *Better understand your emotions and encourage regular reflection.*
   – *अपनी भावनाओं को बेहतर समझें और नियमित चिंतन को प्रोत्साहित करें।*

---

## गोदावरी आयएमआर महाविद्यालयाची विनले पॉलीमर्सला भेट

**जळगाव – बीसीए, बीबीए, एमसीए, एमबीए च्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी गोदावरी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च महाविद्यालयाने औद्योगिक भेटीचे आयोजन केले होते.**

विनले पॉलीमर्सचे प्रमोद संचेती हे संचालक आहेत, ही कंपनी प्लास्टीक बॉटल उत्पादन करते. या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना उद्योगाविषयी जागरूक करणे हा होता, मुख्यत्वेकरून कॉन्ट्रॅक्ट मॅन्युफॅक्चरिंग आणि वितरण प्रणालीवर लक्ष केंद्रित केले. श्री. नीले (प्रॉडक्शन मॅनेजर) यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांची दोन गटांमध्ये विभागणी करण्यात आली होती. श्री. नीले यांनी इ२इ मार्केटिंगमध्ये काम करणाऱ्या कंपनीच्या पुरवठा साखळी व्यवस्थापन, वितरण आणि विपणन प्रक्रियेबद्दल देखील माहिती दिली.







## भुसावळात आरोग्य मार्गदर्शन

**भुसावळ – येथील डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूल भुसावळात विदयार्थी भावनिक व मानसिकदृष्टया सक्षम असावे या उददेशाने आरोग्य मार्गदर्शन आयोजित करण्यात आले.यावेळी वक्ते पियुष वाघ( सहयोगी प्राध्यापक एचओडी फंडामेंटल ऑफ नर्सिंग विभाग गोदावरी कॉलेज जळगाव) व स्कुलच्या प्राचार्य अनघा पाटील हे होते.**

चांगले मानसिक आरोग्य किंवा मानसिकदृष्ट्या निरोगी एखाद्या व्यक्तीकडे संतुलित मन, आत्मविश्वास आणि स्वाभिमान असतो. मानसिक आजार ही एक समस्या आहे. नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी भावनिक व मानसिक दृष्ट्या सशक्त असणे आवश्यक असते असे सांगितले.

## डॉ. वर्षा पाटील वूमन्स कॉलेज ऑफ कॉम्पुटर ॲप्लिकेशनची विनले पॉलीमर्सला भेट




**जळगाव – बीसीए च्या विद्यार्थ्यांनीनी साठी डॉ. वर्षा पाटील वूमन्स कॉलेज ऑफ कॉम्पुटर ॲप्लिकेशन महाविद्यालयाने औद्योगिक भेटीचे आयोजन केले होते.**

विनले पॉलीमर्सचे प्रमोद संचेती हे संचालक आहेत, ही कंपनी प्लास्टीक बॉटल उत्पादन करते. या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना उद्योगाविषयी जागरूक करणे हा होता, मुख्यत्वेकरून कॉन्ट्रॅक्ट मॅन्युफॅक्चरिंग आणि वितरण प्रणालीवर लक्ष केंद्रित केले. श्री. नीले (प्रॉडक्शन मॅनेजर) यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांची दोन गटांमध्ये विभागणी करण्यात आली होती.

# गोदावरीत म.गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री यांना अभिवादन




**जळगाव – गोदावरी अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालय महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री अभिवादन करण्यात आले.**

महात्मा गांधींच्या जीवनाचा आणि तत्त्वांचा सन्मान केला जातो. गांधीजींना ‘राष्ट्रपिता’ मानले जाते. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यामध्ये त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. सामाजिक आणि राजकीय परिवर्तनासाठी अहिंसा, सविनय कायदेभंग व सत्य हे तत्त्व सामर्थ्यवान साधने म्हणून वापरणाऱ्या गांधीजींना श्रद्धांजली देण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . विजयकुमार पाटील, प्रा. दीपक झांबरे (समन्वयक तंत्रनिकेतन) प्रा. हेमंत इंगळे (अधिष्ठाता), महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वर्ग तसेच विद्यार्थी अधिक संख्येने उपस्थित होते. प्रा. तुषार कोळी, प्रा.पवन भंगाळे तसेच गणेश राज पाटील या विद्यार्थ्याने मनोगत व्यक्त केले. त्यामध्ये तिने राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच लालबहादूर शास्त्री यांच्या बद्दल सांगताना त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी केलेल्या कार्याचा उल्लेख केला. यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

### गोदावरी कृषी संकुल

महात्मा गांधी व लालबहादूर **शास्त्री** यांना गोदावरी कृषी संकुल परिसरात अभिवादन केले.

कृषी संकुल परिसरात राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत स्वच्छता ही सेवा २०२४ अभियाना अंतर्गत स्वच्छ भारत दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करण्यात आला, विविध प्रकारचा प्लास्टिक कचरा गोळा करण्यात आला. स्वच्छ्ता ही सेवा पंधरवाडा साजरा करण्यात आला. यासाठी कृषी परिसराचे परिसर संचालक डॉ. एस. एम. पाटील, संशोधन संचालक डॉ. अशोक चौधरी,सहाय्यक उपकुलसचिव श्री अतुल बोंडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शैलेश तायडे व उपप्राचार्य प्रा. प्रवीण देवरे, क्रीडा अधिकारी प्रा. रमाकांत चौधरी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. व परीक्षा विभागाचे विभाग प्रमुख प्रा. शरद पाटील, तसेच प्रा. बालाजी गोणशेटवाड, प्रा. अश्विनी मत्ते, प्रा. अमोल सोहनी, प्रा.निलेश सदार यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छते विषयी संदेश दिला. विद्यार्थ्याने मनोगत व्यक्त केले. त्यामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच लालबहादूर शास्त्री यांच्या बद्दल सांगताना त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी दोन्ही महापुरुषांनी केलेल्या कार्याचा उल्लेख केला. कार्यक्रमाचे प्रास्तविक मनोगत राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. गौरव ढोले यांनी केले. सूत्रसंचालन स्वयंसेविका कु. प्रतीक्षा गावित तर आभार प्रदर्शन स्वयंसेवक वैभव चौधरी यांनी व्यक्त केले.

### व्यवस्थापन महाविद्यालय

महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती निमीत्त अभिवादन. जळगाव गोदावरी फाउंडेशन संचलीतगोदावरी इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च जळगाव महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला महाविद्यालयाचे संचालक डॉ. प्रशांत वारके यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. डॉ. प्रशांत वारके यांनी सोशल मिडियावर महापुरुषा बाबत कही चूकीची माहिती पसरवली जाते अशा गोष्टी आपल्या लक्षात आल्यास आपण त्याला खर या अर्थाने सामोरे गेले पाहिजे सोशल मीडिया वरील महापुरुषाचा आपप्रचार थाबला पाहिजे व नव्या पीढ़ी पर्यत खरा इतिहास हा मांडला गेला पाहिजे अशी इच्छा त्यांनी वेक्त केली. सदर कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### डॉ.वर्षा पाटील वूमन्स कॉलेज

महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती निमीत्त अभिवादन. जळगाव गोदावरी फाउंडेशन संचलीत डॉ. वर्षा पाटील वूमन्स कॉलेज ऑफ कॉम्पुटर ॲप्लिकेशन महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. नीलिमा वारके यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.डॉ.नीलिमा वारके यांनी मार्गदर्शन करताना महात्मा गांधींच्या सत्य, अहिंसा आणि स्वावलंबनाच्या शिकवणीचे महत्त्व सांगितले. तसेच, लालबहादूर शास्त्री यांच्या जय जवान जय किसान या मंत्राचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी शास्त्रीजींच्या साधेपणाचे कौतुक केले. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### डॉ. वर्षा पाटील वूमन्स होम सायन्स महाविद्यालय

डॉ.वर्षा पाटील वूमन्स कॉलेज ऑफ होम सायन्स महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने स्वच्छता ही सेवा सप्ताह आयोजित करण्यात आला. ह्या सप्ताहात महाविद्यालय परिसरातून स्वच्छता रॅली चे आयोजन करण्यात आले विद्यार्थीनीनी हातात फलक व घोषणा देत समाजामध्ये स्वच्छते विषयी जन जागृती केली. चौका चौकात विद्यार्थिनींनी पोस्टर प्रदर्शन केले.

याचबरोबर मुखर्जी उद्यान व रेल्वे स्टेशन परिसरात जाऊन प्लास्टिक संकलन करत स्वच्छता मोहीम राबविली,या वेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य कविता देशमुख, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा. जयश्री कुळकर्णी, प्रा. रेणुका सूर्यवंशी, प्रा.समृद्धी सराफ, प्रा.तेजस्विनी पाटील सर्व प्राध्यापक वर्ग व विद्यार्थीनी उपस्थित होते.



# ४२ वर्षीय महिलेच्या पोटातून काढले तीन किलोचे दोन गोळे



## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात स्त्रीरोग तज्ञांकडून यशस्वी शस्त्रक्रिया

**जळगाव – भुसावळ येथील एका ४२ वर्षीय महिलेच्या पोटातून तब्बल तीन किलोचे मांसाचे दोन गोळे काढण्यात आले. डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयातील स्त्रीरोग तज्ञांनी केलेली ही शस्त्रक्रिया यशस्वी ठरली आहे.**

याबाबत माहिती अशी की, भुसावळ येथील नंदाबाई नामक महिला रूग्णाच्या पोटात दोन आठवड्यांपासून दुखत होते. औषधी घेऊनही त्यांना आराम पडत नव्हता. पोटातील वेदना असह्य झाल्याने रूग्णाला डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाच्या स्त्रीरोग विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले. याठिकाणी स्त्रीरोग तज्ञ डॉ. प्रिया राठोड आणि डॉ. हंसिया पिल्लई यांनी रूग्णाची सोनोग्राफी करण्याचा सल्ला दिला. सोनोग्राफी केल्यानंतर महिलेच्या गर्भपिशवीच्या ठिकाणी १०/१२ सेंमीचे दोन गोळे असल्याचे निदान करण्यात आले. निदानानंतर महिलेवर तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. स्त्रीरोग तज्ञ डॉ. प्रिया राठोड आणि डॉ. हंसिया पिल्लई, डॉ. रश्मी संघवी यांनी महिलेवर शस्त्रक्रिया करून तीच्या पोटातून दोन मांसाचे गोळे काढले. ह्या गोळ्यांचे वजन सुमारे तीन किलो इतके होते. पोटातून गोळे काढल्यानंतर महिलेला आराम पडू लागला. दीड तासांच्या अथक प्रयत्नांनी ही शस्त्रक्रिया यशस्वी ठरली.

> **पोटदुखीचा त्रास अनेक दिवसांपासून होत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नये. साधी पोटदुखी ही गंभीर आजाराचे स्वरूप असू शकते. वेळीच वैद्यकीय तज्ञांचा सल्ला घेतल्यास महिलांमध्ये असलेली पोटदुखी ही दूर करता येऊ शकते. तसेच प्रत्येक महिलेने आपल्या आरोग्याची किमान सहा महिन्यांनंतर तपासणी करून घ्यावी.**



–डॉ. हंसिया पिल्लई
निवासी डॉक्टर

# शैक्षणिक साहित्यांची भेट देऊन कन्या सन्मान

✻ डॉ. केतकीताई पाटील यांची संकल्पना;
✻ डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगरात राबविला स्तुत्य उपक्रम

**जळगाव – शहरात आज डॉ.केतकी ताई पाटील यांच्या संकल्पनेतून आणि बाल भीम व्यायाम शाळा मित्र मंडळ, आंबेडकर नगर, जुने जळगाव यांच्या सहकार्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज मंदिरात कन्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. मुलींना शिक्षणाबद्दल आवड निर्माण व्हावी. त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे याकरिता वह्यांचे वाटप करण्यात आले. याशिवाय आरोग्य सुदृढ राहावे यासाठी शाळेत जाताना नियमित डब्बा न्यावा असे आवाहन करून जेवणाचा डब्बाही भेट दिला.**

या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून भाजपा महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. केतकी ताई पाटील, भाजपा महिला मोर्चा प्रदेश सचिव रेखाताई वर्मा, भाजपा महिला मोर्चा महानगर प्रमुख भारतीताई सोनवणे ,माजी महापौर सीमाताई भोळे, नंदाताई सोनवणे, खुशबू ताई बनसोडे, जिजाबाई सोनवणे, ज्योती सोनवणे, कविता सोनवणे, सोनाली सोनवणे ह्या उपस्थित होत्या. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भगवान गौतम बुद्ध, रमाई आंबेडकर, सावित्रीबाई फुले यांना पुष्पहार अर्पण करून कन्या सन्मानास सुरुवात झाली. या प्रसंगी मान्यवरांनी उपस्थित कन्यांचे पाय धुवून त्यांना मिष्टान्न देऊन तसेच टिफीन, प्रत्येकी ५ वही, नेलपॉलिश, टिकली आदी साहित्य वितरित करण्यात आले. भेटवस्तू मिळाल्याचा आनंद मुलींच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता. तसेच परिसरातील नागरिकांमधूनही या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले. या वेळी धीरज वर्मा, प्रकाश सोनवणे, मयूर सोनवणे, कमलाकर बनसोडे, किरण सोनवणे, मोहित बनसोडे ,राहुल सोनवणे, सचिन सोनवणे, शरद सपकाळे आदी उपस्थित होते.



# ११ वर्षीय बालिकेच्या हृदयावरील छिद्रावर यशस्वी शस्त्रक्रिया

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या डॉक्टरांची कमाल



**जळगाव : आरोग्य शिबिरातून आजारावर उपचाराची दिशा गवसलेल्या ११ वर्षीय बालिकेच्या हृदयावरील छीद्रावर यशस्वी शस्त्रक्रिया करुन एका लहानग्याला जीवनदान देणारे डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या हृदयरोग डॉक्टरांनी कमाल केली.**

लहान मुलांच्या हृदयावर शस्त्रक्रिया करणे अत्यंत कठीण काम असते, कारण अशावेळी त्यांच्या जीवाला जास्त धोका असतो, मात्र एका लहानग्यासाठी डॉक्टरांनी देवदूतासारखी भूमिका निभावत ही किमया करून दाखवली आहे. आरोग्य शिबिरातून गवसलेल्या या ११ वर्षीय बालिकेच्या हृदयावरील छीद्रावर यशस्वी शस्त्रक्रिया करुन लहानग्याला जीवनदान देणारे डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या कॉर्डिओलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. वैभव पाटील, डॉ. हार्दिक मोरे, डॉ.मोहीत, डॉ. ललीत, डॉ.निखील यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**बाळाच्या हृदयाला होते २४ मि.मि.चे छिद्र**

जामनेर तालुक्यातील भारूडखेडे येथील रहिवाशी मनोज गोसावी यांच्या ११ वर्षीय बालिकेला श्वास घेण्यास त्रास आणि पुरेशी झोप येत नसल्याचे निदर्शनास आले, त्यानंतर त्यांनी जामनेरात व इतर ठीकाणी या मुलीच्या चाचण्या केल्या त्यावेळी या बालिकेच्या हृदयाला २४ मि.मि. आकाराचे छिद्र असल्याचे निदर्शनास आले. हृदयाचा आकार लहान असल्यामुळे शस्त्रक्रिया करण्यास अडचण असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या शस्त्रक्रियेसाठी मोठा खर्च देखिल सांगण्यात आला. आर्थीक विवंचनेत असतांना त्यांनी डॉ.उल्हास पाटील वैद्यकिय रुग्णालयात डॉ हार्दिक मोरे यांचेशी संपर्क साधाला. त्यांनी बालीकेला दाखल करण्यास सांगितले व ट्रान्सकॅथेटर प्रक्रिया राबवून ही यशस्वी शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मोफत केली. शस्त्रक्रियेनंतर बाळाच्या प्रकृतीत सुधारणा होत असून बाळाचा आहार आणि झोप व्यवस्थित होत असल्याचे दिसून आले आहे.

> **जन्मत: बालकांच्या हृदयाला छिद्र असू शकते. अशा प्रकारच्या बालकांची योग्य वेळी तपासणी आणि निदान होणे आवश्यक आहे. जन्मत: हृदयाला छिद्र असलेल्या बालकांना अनेकदा त्रास होत असतो. भविष्यात देखील हा त्रास वाढून हृदयविकाराची शक्यता अधिक असते. त्यामुळे अशा बालकांचे तपासणी आणि निदान झाल्यानंतर योग्य ते उपचार केल्यास संभाव्य धोके टाळता येवू शकतात. डॉ. उल्हास पाटील रुग्णालयात बालकांच्या हृदयावर असलेली शस्त्रक्रिया तज्ञ डॉक्टरांकडून केली जाते.**



– हार्दिक मोरे
हृदयरोग तज्ञ

# आदिवासींचे जीवनमान बदलणारे आदिमित्र संशोधन प्रकल्पाचे काम पूर्ण

**जळगाव – आदिवासी बांधव त्यांच्या दैनदिन अत्यावश्यक सोयीसुविधापासून वंचित आहेत जसे की, जात प्रमाणपत्र, जन्म दाखला, रेशन कार्ड, आधार कार्ड आदी या समस्यांवर मार्ग काढण्यासाठी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या संकल्पनेतून उपरोक्त गरजांची पुर्तता होण्यासाठी येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व जिल्हाधिकारी कार्यालय अंतर्गत 'आदीमित्र' या नावाने सामंजस्य करार डिसेंबर २०२३ मध्ये करण्यात आला होता. त्याचे काम पूर्ण झाले असून त्या अहवालाचे सादरीकरण जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या समोर करण्यात आले.**

हे सादरीकरण कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून प्रा. डॉ. प्रशांत सोनवणे यांनी सादरीकरण केले. या प्रसंगी यावल येथील आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी अरूण पवार, प्रा. दिगंबर सावंत, प्रा. विनेश पावरा हे उपस्थित होते.



विद्यापीठाचे कुलगुरू डॉ व्ही. एल. माहेश्वरी व सामाजिक शास्त्रे प्रशाळेचे संचालक डॉ अजय पाटील यांची भूमिका महत्वाची होती. या करारानुसार पेसा अंतर्गत आदीमित्र संशोधन प्रकल्पाचे सर्वेक्षण रावेर, चोपडा व यावल तालुक्यातील एकूण ८७ गावांचे करण्यात आले असून त्यात एकूण ९७४२ कुटुंबांना प्रत्यक्ष भेटी देऊन शासनामार्फत देण्यात येणाऱ्या शबरी घरकुल योजना, किसान सन्मान निधी, पंतप्रधान आवास योजना, ठक्कर बाप्पा योजना, श्रावण बाळ वृद्धापकाळ योजना, इंदिरा गांधी विधवा योजना, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना, प्रधानमंत्री वनधन विकास योजना, संजय गांधी निराधार योजना, उज्वला गॅस योजना आदी योजनांची माहिती व सदर योजना प्रत्यक्षात सदर आदिवासी बांधवांना मिळतात की नाही या बाबत विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे विभागा मार्फत सर्वेक्षण घेण्यात आले. हा संशोधन प्रकल्प सामाजिक शास्त्र प्रशाळेतील संचालक डॉ अजय पाटील यांच्या प्रमुख मार्गदर्शना खाली प्रकल्प समन्वयक डॉक्टर प्रशांत सोनवणे, दिगंबर सावंत, गोपाळ पाटील, डॉ. समाधान कुंभार डॉ. कविता पाटील श्रीमती वर्षा पालखे,डॉ.समाधान कुंभार विनेश पावरा प्रदीप गोफणे, योगेश माळी आणि सर्व विद्यार्थी यांनी केले आहे.

# महाराष्ट्रातील १४३ शासकीय औद्योगिक संस्थांना नवी ओळख

## जळगाव जिल्ह्यातील १२ संस्थांचे नामकरण

जळगाव – कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या पुढाकारामुळे महाराष्ट्रातील १४३ शासकीय औद्योगिक संस्थांचे नामकरण यशस्वी पणे करण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांपूर्वीच १४ शासकीय औद्योगिक संस्थांचे नामकरण करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाद्वारे घेण्यात आला होता. त्यांनतर कौशल्य विकास विभागाद्वारे महाराष्ट्रातील शासकीय औद्योगिक संस्थांसाठी नागरिकांकडून नावाबाबत सूचना मागवण्यात आल्या होत्या. त्यानुसार जळगाव जिल्ह्यातील १२ शासकीय औद्योगिक संस्थांचे नामकरण करण्यात आले. महाराष्ट्रातील फक्त २ औद्योगिक संस्था सोडल्या तर इतर औद्योगिक संस्थांना या आधी कोणत्याही प्रकारची नावे नव्हती.



या बाबत मंत्री लोढा म्हणाले औद्योगिक संस्थांचे नामकरण हा केवळ एक निर्णय नसून, महाराष्ट्रातील तरुणांना प्रेरणा देण्यासाठीचा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या संस्थांना आदर्श नेतृत्वांच्या नावाने ओळख मिळाल्याने या विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची शिकवण व प्रेरणा मिळेल. युवकांचा कौशल्यविकास हे राज्याच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक आहे, आणि या नावांमुळे प्रत्येक प्रशिक्षणार्थीला आपल्या कार्यात सामाजिक जबाबदारीची जाणीव होईल. हा उपक्रम नव्या पिढीला त्यांच्या भविष्याच्या वाटचालीसाठी प्रेरणा देईल आणि त्यांच्या मेहनतीला एक दिशा देईल.